**प्रेस नोट** **दिनांक ३०/०३/२०१९**

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे

## पॅटर्न लॉक असलेला  गहाळ मोबाईल परत

दि.२६/०३/२०१९ रोजी स्वारगेट मार्शल रात्रपाळी ड्युटीस पो. हवा. केंजळे व पो.शि. सरक यांना कर्तव्य असताना एका अनोळखी रिक्षावाल्याने त्याचे रिक्षात राहिलेला एल.जी.कंपनीचा मोबाईल आणून दिला.सदर मोबाईलला पॅटर्न लॉक असल्यामुळे व त्यामध्ये सीमकार्ड नसलेने सदरचा मोबाईल कोणाचा आहे हे समजून येत नव्हते. पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री सय्यद यांचे मार्गदर्शनानुसार सदर मोबाईलचे पॅटर्न लॉक काढून त्यातील कॉनटॅक्ट लिस्ट मधील कॉनटॅक्ट वर फोन करून तो मोबाईल स्वप्निल ठाकरे रा. वाघोली पुणे यांचा असलेबाबत माहिती मिळाली त्याबाबत खात्री करून त्यांना पोलीस स्टेशन येथे बोलावून पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री सय्यद यांचे समक्ष मोबाईल परत करण्यात आला आहे.

